# भारतातील विदेशी गुंतवणुकीवर कोव्हिड–१९ चा झालेला परिणाम

**डॉ. युवराज पंढरीनाथ जाधव**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र)
एम.व्ही.पी. समाजाचे कला, विज्ञान आणि
वाणिज्य महाविद्यालय, ओझर (मिग)
ता. निफाड, जि. नाशिक ४२२२०६.

**गोषवारा**

*थेट परदेशी गुंतवणूक धोरणात सुधारणा, गुंतवणुकीची सुविधा आणि व्यवसाय सुलभता या आघाडीवर सरकारने केलेल्या उपाययोजनांमुळे देशात थेट परदेशी गुंतवणुकीचा प्रवाह वाढला आहे. भारताच्या थेट परकीय गुंतवणुकीमधील खालील कल जागतिक गुंतवणूकदारांमध्ये गुंतवणुकीसाठी भारत हा प्राधान्य देश असल्याचे समर्थन करतो. मागील ०६ वर्षांच्या कालावधीसाठी (२०१४–१५ ते २०१९–२०) एकूण एफडीआय ओघ ५५ टक्क्याने वाढला म्हणजेच २००८–१४ मधील २३१.३७ अब्ज अमेरिकन डॉलर्स वरुन २०१४–२० मध्ये ३५८.२९ अब्ज डॉलरवर गेला. भारतात २०२०–२१ मध्ये ८००९२ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झालेली असून २०२०–२१ मध्ये ४३९५५ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी सर्वाधिक निव्वळ विदेशी गुंतवणूक झाल्याचे दिसून येते. , भारतात २०१८ ते डिसेंबर २०२० या कालावधीत संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर क्षेत्रात अनुक्रमे ६.४२ दशलक्ष डॉलर, ७.६७ दशलक्ष डॉलर, २४.३९ दशलक्ष डॉलर इतकी गुंतवणूक झाल्याचे दिसते. कोव्हिड–१९ चा परिणाम जगातील सर्वच देशांवर झाल्याने अर्थव्यवस्थेला आर्थिक संकटांचा सामना करावा लागला. जगातील अनेक विकसित देशांचा जीडीपी उणे झालेला असून त्यास विकसनशील व अविकसित देशही सुटलेले नाहीत. जगातील अनेक कंपन्यांनी चीनमध्ये गुंतवणूक व उत्पादन सुरु केले होते परंतु कोव्हिड–१९ चा पहिला रुग्ण चीनमध्ये सापडल्याने व चीनवर कोव्हिड पसरवल्याचा आरोप झाल्याने अनेक विदेशी कंपन्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाल्याने अनेक कंपन्यांनी आपली गुंतवणूक चीन मधून भारतात करण्यास सुरुवात केली. गेल्या २६ महिन्यात म्हणजेच एप्रिल–मे २०२१ पर्यंत भारतात १,३४,९६६ दशलक्ष डॉलर इतकी गुंतवणूक झालेली दिसून येते. विकसनशील भारतात होणाऱ्या विदेशी गुंतवणुकीमुळे विकासाला चालना मिळण्यास सुरुवात होईल आणि विकसनशील भारत विकसित भारत होण्यास यामुळे मदत होईल. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर केला असून विदेशी गुंतवणूक संकल्पनेचा आढावा घेणे. भारतीय कोव्हिड–१९ चा विदेशी गुंतवणुकीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे. या उद्दिष्टांच्या आधारे भारतातील विदेशी गुंतवणुकीवर कोव्हिड–१९ चा झालेला परिणामांचा सविस्तर आढावा घेतलेला आहे.*

***महत्त्वाचे शब्द (Keywords) :*** *विदेशी गुंतवणूक, कोव्हिड–१९, एफडीआय, डॉलर्स, भांडवल इ.*

**प्रस्तावना**

भारतात कोव्हिड म्हणजेच कोरोनाचा पहिला रुग्ण मार्च २०२० मध्ये सापडला आणि भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक गती मंदावण्यास सुरुवात झाली. भारत हा जगातील सर्वात मोठी बाजारपेठ असणारा विकसनशील देश म्हणून ओळखला जातो. कोरोनाचा पहिला फटका चीनला बसल्याने आणि कोरोनाचा निर्माता म्हणून संशयाने चीनकडेच पाहिले जात असल्याने तेथे असणाऱ्या अनेक विदेशी कंपन्यांना प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागल्याने अनेक कंपन्यांनी आपली कार्यालये, उद्योग भारतामध्ये स्थलांतरीत करुन विदेशी गुंतवणूक करु लागलेले दिसून येते.थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) हा आर्थिक विकासाचा प्रमुख चालक आहे आणि भारताच्या आर्थिक विकासासाठी बिगर–कर्ज वित्तपुरवठ्याचा महत्त्वपूर्ण स्रोत आहे. सक्षम आणि गुंतवणूकदारांना अनुकूल थेट परकीय गुंतवणूक धोरण लागू करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. थेट परकीय गुंतवणूक धोरण अधिक गुंतवणूकस्नेही बनवणे आणि देशातील गुंतवणूकीच्या ओघाला बाधा आणणारे

धोरण अडथळे दूर करणे हा यामागील हेतू आहे. गेल्या सहा वर्षांत या दिशेने उचललेल्या पावलांना फळ मिळाले आहे, देशात थेट परदेशी गुंतवणुकीचा ओघ कायम वाढत आहे. थेट परदेशी गुंतवणुकीचे उदारीकरण आणि सरलीकरणाच्या मार्गावर वाटचाल सुरू ठेवून सरकारने विविध क्षेत्रांत थेट परदेशी गुंतवणूक सुधारणा केल्या आहेत. थेट परदेशी गुंतवणूक धोरणात सुधारणा, गुंतवणुकीची सुविधा आणि व्यवसाय सुलभता या आघाडीवर सरकारने केलेल्या उपाययोजनांमुळे देशात थेट परदेशी गुंतवणुकीचा प्रवाह वाढला आहे. भारताच्या थेट परकीय गुंतवणुकीमधील खालील कल जागतिक गुंतवणूकदारांमध्ये गुंतवणुकीसाठी भारत हा प्राधान्य देश असल्याचे समर्थन करतो. मागील ०६ वर्षांच्या कालावधीसाठी (२०१४–१५ ते २०१९–२०) एकूण एफडीआय ओघ ५५ टक्क्याने वाढला म्हणजेच २००८–१४ मधील २३१.३७ अब्ज अमेरिकन डॉलर्स वरुन २०१४–२० मध्ये ३५८.२९ अब्ज डॉलरवर गेला. एफडीआय इक्विटीचा ओघ देखील ५७ टक्क्यांनी वाढून २००८–१४ मधील १६०.४६ अब्ज डॉलर्सवरून २५२.४२ अब्ज डॉलर्स वर (२०१४–२०) गेलेला दिसतो. आर्थिक वर्ष २०२०–२१ (एप्रिल ते ऑगस्ट २०२०) एप्रिल ते ऑगस्ट २०२० या काळात एकूण ३५.७३ अब्ज अमेरिकन डॉलरची एफडीआय ओघ प्राप्त झाला. आर्थिक वर्षातील पहिल्या पाच महिन्यांमधील ही सर्वोच्च पातळी असून २०१९–२० च्या पहिल्या पाच महिन्यांमधील (३१.६० अब्ज अमेरिकन डॉलर्स) तुलनेत १३ टक्के जास्त आहे. २०२०–२१ (एप्रिल ते ऑगस्ट २०२०) आर्थिक वर्षात एफडीआय इक्विटी ओघ २७.१० अब्ज डॉलर्स आहे. आर्थिक वर्षातील पहिल्या पाच महिन्यांमधील ही सर्वोच्च पातळी असून २०१९–२०च्या पहिल्या पाच महिन्यांमधील (२३.३५ अब्ज डॉलर्स) च्या तुलनेत १६ टक्क अधिक असल्याचे दिसते.[२]

## विदेशी गुंतवणूक म्हणजे काय?

''परकीय देशातील व्यक्ती, परकीय देशातील संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या, आणि सरकार यांनी परकीय चलनाच्या स्वरुपात यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान या स्वरुपाचे भांडवल भारतामध्ये आणले तर त्याला विदेशी गुंतवणूक असे म्हणतात.''

## अभ्यासाची उद्दिष्टे

१) विदेशी गुतवणूक संकल्पनेचा आढावा घेणे.

२) भारतातील विदेशी गुंतवणुकीवर कोव्हिड–१९ चा झालेल्या परिणामांचा आढावा घेणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला असून संशोधनामध्ये पुस्तके, ऑनलाईन वृत्तपत्रे, संकेतस्थळे इत्यादीचा वापर संशोधन व्यवस्थित होण्यासाठी केला आहे.

## विदेशी गुंतवणूक संकल्पना

थेट परकीय गुंतवणूक म्हणजे दोन विविध देशांतर्गत कंपन्यांना एकमेकांच्या देशात गुंतवणूक करण्याची मुभा. अशा प्रकारच्या गुंतवणूकीमुळे दोन्ही कंपन्यांना एकमेकांच्या देशात काही ठराविक टक्के रक्कम गुंतवण्याची संधी मिळते. देशात परकीय भांडवल मोठ्या प्रमाणात गुंतवल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेलाही चांगला फायदा होतो. सर्वसाधारणपणे परकीय गुंतवणुकीसाठी कोणत्याही कंपनीला दुसऱ्या कंपनीचे १० टक्के शेअर्स खरेदी करावे लागतात. मात्र एखाद्या कंपनीने ५१ टक्के शेअर्स खरेदी केल्यास दुसऱ्या कंपनीची ओनर कंपनी म्हणून ओळखली जाऊ शकते. भारतात रिटेल क्षेत्राचा व्याप फार मोठा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत रिटेल क्षेत्राचा वाटा हा अंदाजे १५ टक्के आहे. त्याशिवाय देशाच्या अर्थव्यवस्थेत रिटेल क्षेत्राच्या माध्यमातून सरकारच्या कोट्यात दरवर्षी २५० कोटी डॉलर्स परकीय चलन येते. विदेशातील कंपन्या जशा अनेक देशात भांडवल गुंतवतात तशाच भारतातल्या अनेक कंपन्यांनीदेखील विदेशातील अनेक देशांत भांडवलाची गुंतवणूक केलेली आहे. अफ्रिका, चीन, इंग्लंडच काय थेट अमेरिकेतही आपल्या देशातील अनेक कंपन्यांची गुंतवणूक आहे. विदेशी कंपन्यांना आपला पैसा गुंतवायचा असेल तर आपल्या सरकारची परवानगी घ्यावी लागते. अशी परवानगी घेऊन अनेक विदेशी कंपन्या यापूर्वीच भारतात आलेल्या आहेत. फॉरेन डायरेक्ट इन्व्हेसमेंट (एफडीआय) म्हणजे, विदेशाची थेट गुंतवणूक होय. देशात तीन प्रकारच्या कंपन्या असतात. निखळ देशी भांडवल असलेल्या कंपन्या, देशी भांडवलासोबत विदेशी भांडवल वापरणाऱ्या कंपन्या व केवळ विदेशी भांडवल असणाऱ्या कंपन्या. सरकारने विदेशी कंपन्यांना निम्म्यापेक्षा अधिक गुंतवणुकीला परवानगी

दिली. संयुक्त भांडवल गुंतवणुकीच्या अनेक कंपन्या आहेत. नोकिया किंवा कोकाकोला ही थेट गुंतवणुकीची उदाहरणे आहेत.[३]

### भारतातील विदेशी गुंतवणुकीतील परिणामाचा आढावा

भारतीय अर्थव्यवस्था २०२०—२१ मध्ये साथीच्या रोगाने उद्ध्वस्त झाली होती, परंतु थेट विदेशी गुंतवणुकीचा (एफडीआय) प्रवाह विक्रमी उच्चांकावर होता. जुलै ते सप्टेंबर तिमाहीत भारताला एकूण २८.१ अब्ज डॉलर्स आणि मागील एप्रिल ते जून तिमाहीत ११.५ अब्ज डॉलर्सची एफडीआय प्राप्त झाली आणि आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत एकूण ३९.६ अब्ज डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक वाढली. यातील ३० अब्ज डॉलर्स इक्विटी एफडीआय प्रवाहाच्या स्वरूपाचे होते किंवा मुळात परदेशी कंपन्यांनी भारतीय कंपन्यांमध्ये इक्विटी स्टेक्ससाठी केलेली गुंतवणूक तर उर्वरित पैसे गुंतवणूक कमाई किंवा नफा म्हणून पुन्हा व्यवसायात वळवले गेले. डिपार्टमेंट ऑफ प्रमोशन फॉर इंडस्ट्री अँड इंटरनल ट्रेड (DPIIT) कडील आकडेवारीनुसार २०२०—२१ च्या पहिल्या सहामाहीत यापैकी बहुतेक इक्विटी एफडीआयचा प्रवाह संगणक सॉफ्टवेअर सेगमेंटमध्ये होता आणि रिलायन्स इंडस्ट्रीजची उपकंपनी जिओ प्लॅटफॉर्ममधील गुंतवणुकीमुळे लि. **FDI** मध्ये तीव्र वाढ आणि चालू आर्थिक वर्षात **GDP** मध्ये संकुचित होण्यामुळे **FDI** मध्ये जीडीपीची टक्केवारी मागील वर्षांच्या पातळीला ओलांडू शकते. ही पातळी गेल्या पाच वर्षांमध्ये स्थिर राहिली आहे. संगणक सॉफ्टवेअरच्या श्रेणीला देशातील सर्व इक्विटी एफडीआयमध्ये ५८ टक्के १७.५ अब्ज डॉलर्स प्राप्त झाले, त्यानंतर सेवा क्षेत्राला २.२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त कालावधीत एफडीआयचे सुमारे ०८ टक्के प्राप्त झाले. ट्रेडिंग, ऑटोमोबाईल, इन्फ्रास्ट्रक्चर, हॉटेल आणि पर्यटन आणि टेलिकॉम सारख्या इतर क्षेत्रांमध्ये मागील वर्षांच्या तुलनेत लक्षणीय परदेशी गुंतवणूक अजून दिसून आली नाही. यापैकी काही क्षेत्रे साथीच्या आजारामुळे आणि नंतरचे लॉकडाऊन आणि शारीरिक संपर्क आवश्यक असलेल्या क्षेत्रांवर घातलेल्या निर्बंधांमुळे सर्वात जास्त प्रभावित झाले. जिओ प्लॅटफॉर्ममध्ये भरीव गुंतवणूक केल्यानंतर सप्टेंबर तिमाहीत तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये गुंतवणूक शिगेला पोहोचली. फेसबुक, सिल्व्हर लेक, व्हिस्टा इक्विटी भागीदार आणि इतर कंपन्यांनी या कालावधीत देशात १५ अब्ज डॉलर्स किंवा एकूण एफडीआय इक्विटी प्रवाहाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुंतवणुकीची घोषणा केली. आकडेवारीनुसार गुजरात राज्याला सर्वात जास्त परकीय गुंतवणूक प्राप्त झाली आणि त्यानंतर महाराष्ट्राने प्रामुख्याने जिओ प्लॅटफॉर्ममध्ये गुंतवणूक केली. २०१७—१८ आणि २०१८—१९ मध्ये तुलनेने अल्प वाढ नोंदवल्यानंतर भारतात विदेशी गुंतवणूक २०१८—२०१९ मध्ये ६२ अब्ज डॉलर्स आणि २०१७—१८ मध्ये ६०.९ अब्ज डॉलर्स वरुन २०१९—२० मध्ये ७४ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. कोव्हिडनंतर एफडीआय आणि एफपीआय प्रवाह सातत्याने वाढत आहेत. भारताबद्दल गुंतवणूकदारांची भावना बरीच सकारात्मक आहे. पुढे जाऊन, संरक्षण क्षेत्र खुले झाल्यामुळे, पुढील काही वर्षांमध्ये या क्षेत्रात भरीव विदेशी गुंतवणूक होऊ शकते. भारतात येणाऱ्या एफडीआयची एकूण देशांतर्गत उत्पादनाची टक्केवारी म्हणून गणना केली असता २०१९—२० मध्ये संपलेल्या गेल्या पाच वर्षांमध्ये २.३—२.६ टक्क्यांच्या आसपास स्थिर आहे. तथापि, कोव्हिड—१९ महामारीमुळे नाममात्र जीडीपीमध्ये घट झाल्यामुळे तसेच एफडीआय प्रवाहात तीव्र वाढ झाल्यामुळे व जिओमधील गुंतवणुकीमुळे जीडीपीची टक्केवारी जीडीपीच्या ०३ टक्क्यांपेक्षा अधिक असेल म्हणून हे बदलू शकते. एप्रिल—सप्टेंबर या कालावधीत, सहामाही जीडीपीची टक्केवारी म्हणून एफडीआयचा प्रवाह ३.५ टक्के होता. आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत अर्थव्यवस्थेचा विस्तार होत असल्याने ही संख्या कमी होऊ शकते. एफडीआय हे देशाच्या जागतिकीकरणाच्या पातळीचे सूचक आहे. जीडीपीची टक्केवारी म्हणून एफडीआय स्थिर राहिली आहे, याचा अर्थ असा की गेल्या काही वर्षांत देशाचे जागतिकीकरण झाले नाही. पण एक लक्षात ठेवायला हवे की, गेल्या पाच वर्षांतही अशी वेळ आली आहे जेव्हा देशांनी जगभरातून आत पाहिले आहे आणि जागतिकीकरणविरोधी भावना समोर आल्या आहेत.[४]

### भारतातील निव्वळ विदेशी गुंतवणुकीनिहाय वर्गवारी

भारतातील विदेशी गुंतवणुकीत २०१० ते २०२०—२१ मध्ये किती टक्के वाढ/घट झाली याविषयी माहिती तक्ता १.१ मध्ये दिली आहे.

VOL- VIII ISSUE- VIII AUGUST 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

**तक्ता १.१. भारतातील निव्वळ विदेशी गुंतवणुकीनुसार वर्गीकरण**

| अ. नं. | वर्ष | गुंतवणूक दशलक्ष अमेरिकन डॉलर | वाढ/घट |
|---|---|---|---|
| ०१ | २०१०–११ | ११३०५ | – – |
| ०२ | २०११–१२ | २२००६ | १०७१० |
| ०३ | २०१२–१३ | १९८१९ | –२१८७ |
| ०४ | २०१३–१४ | २१५६४ | १७४५ |
| ०५ | २०१४–१५ | ३२६२८ | ११०६४ |
| ०६ | २०१५–१६ | ३६०२१ | ३३९३ |
| ०७ | २०१६–१७ | ३५६१२ | –४०९ |
| ०८ | २०१७–१८ | ३०२८६ | –५००० |
| ०९ | २०१८–१९ | ३०७१२ | ४२६ |
| १० | २०१९–२० | ४३०१३ | १२३०१ |
| ११ | २०२०–२१ | ४३९५५ | ९४२ |
| १२ | २०२१–२२* | ११९८९ | –३२०५७ |

स्रोत : https://rbi.org.in/Scripts/BS_ViewBulletin.aspx?Id=20414[५]

*एप्रिल–मे २०२१–२२

तक्ता १.१ वरुन असे दिसते की, भारतातील निव्वळ विदेशी गुंतवणुकीविषयी विश्लेषण केले असता भारतात २०२०–२१ मध्ये ४३९५५ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी सर्वाधिक निव्वळ विदेशी गुंतवणूक झाल्याचे दिसून येते. त्याखालोखाल २०१९–२० मध्ये ४३०१३ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झाली तर २०१५–१६ मध्ये ३६०२१ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झालेली असून एप्रिल–मे २०२१–२२ या दोन महिन्याच्या कालावधीत ११९८९ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झाल्याचे दिसते. यावरुन असे स्पष्ट होते की, २०१९–२०, २०२०–२१ व एप्रिल–मे २०२१–२२ या कालावधीत भारतात झालेल्या विदेशी गुंतवणुकीचे प्रमाण लक्षणिय असल्याचे दिसून येते. तसेच चीन मध्ये असणाऱ्या अनेक कंपन्या व त्यांची कार्यालये कोव्हिड–१९ मुळे बंद असल्याने त्यांच्या उत्पादन व उत्पन्नामध्ये घट झाल्याने त्यांनी आशिया खंडात चीन शेजारी असणाऱ्या व जगातील सर्वात मोठी बाजारपेठ असणाऱ्या भारतात विदेशी गुंतवणूक केलेली दिसते. तसेच भारतात कोव्हिड–१९ च्या पहिल्या लाटेचा खूप मोठा परिणाम झालेला नसल्याने विदेशी गुंतवणूक वाढलेली दिसून येते.

**भारतातील विदेशी गुंतवणुकीच्या ओघानिहाय वर्गवारी**

भारतातील विदेशी गुंतवणुकीत कोव्हिड–१९ पूर्वी व नंतर काय बदल झाला याविषयी माहिती जाणून घेण्यासाठी २०१०–११ ते २०२०–२१ याकाळात भारतातील विदेशी गुंतवणुकीच्या ओघाविषयी माहिती तक्ता १.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १.२. भारतातील विदेशी गुंतवणुकीच्या ओघानुसार वर्गीकरण**

| अ. नं. | वर्ष | गुंतवणूक दशलक्ष अमेरिकन डॉलर | वाढ/घट |
|---|---|---|---|
| ०१ | २०१०–११ | ४१५९७ | – – |
| ०२ | २०११–१२ | ३९१७७ | –२४२० |
| ०३ | २०१२–१३ | ४६७१० | ७५३३ |
| ०४ | २०१३–१४ | २६३८५ | –२०३२५ |
| ०५ | २०१४–१५ | ७३५६२ | ४७१७७ |
| ०६ | २०१५–१६ | ३१८९१ | –४१६७१ |
| ०७ | २०१६–१७ | ४३२२४ | ११३३३ |
| ०८ | २०१७–१८ | ५२४०१ | ९१७७ |
| ०९ | २०१८–१९ | ३००९४ | –२२३०७ |
| १० | २०१९–२० | ४४४१७ | १४३२३ |
| ११ | २०२०–२१ | ८००९२ | ३५६७५ |
| १२ | २०२१–२२* | १०४५७ | –६९६३५ |

स्रोत : https://rbi.org.in/Scripts/BS_ViewBulletin.aspx?Id=20414[५]

*एप्रिल–मे २०२१–२२

तक्ता १.२ वरुन असे दिसते की, भारतातील २०१०–११ ते २०२०–२१ याकाळात विदेशी गुंतवणुकीच्या ओघाविषयी विश्लेषण केले असता एप्रिल–मे २०२१–२२ या दोन महिन्याच्या कालावधीत भारतात १०४५७ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झाल्याचे दिसून येते. त्याखालोखाल २०२०–२१ मध्ये ८००९२ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक तर २०१९–२० या कालावधीत ४४४१७ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झालेली असून २०१३–१४ मध्ये सर्वात कमी म्हणजेच २६३८५ दशलक्ष

अमेरिकन डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झालेली दिसते. याचाच अर्थ, भारतात कोव्हिड–१९ च्या कालावधीत म्हणजेच २०१९–२० ते एप्रिल–मे २०२१–२२ या कालावधीत १,३४,९६६ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झाल्याचे स्पष्ट होते.

**क्षेत्रनिहाय विदेशी गुंतवणुकीनिहाय वर्गवारी**

भारतातील एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०२० च्या कालावधीत क्षेत्रनिहाय किती दशलक्ष डॉलर विदेशी गुंतवणूक झाली याविषयी माहिती तक्ता १.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १.३. क्षेत्रनिहाय विदेशी गुंतवणुकीनुसार वर्गीकरण**

| अ. नं. | क्षेत्र | २०१८–१९ एप्रिल–मार्च | २०१९–२० एप्रिल–मार्च | २०२०–२१ एप्रिल–डिसेंबर |
|---|---|---|---|---|
| ०१ | सेवा क्षेत्र | ९.१६ | ७.८५ | ३.८६ |
| ०२ | संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर | ६.४२ | ७.६७ | २४.३९ |
| ०३ | दूरसंचार | २.६७ | ४.४५ | ०.३५ |
| ०४ | व्यापार | ४.४६ | ४.५७ | २.१४ |
| ०५ | बांधकाम विकास | ०.२१ | ०.६१ | ०.२७ |
| ०६ | वाहन उद्योग | २.६२ | २.८२ | १.१९ |
| ०७ | बांधकाम पायाभूत उपक्रम | २.२६ | २.० | ७.१५ |
| ०८ | रसायन | १.९८ | १.० | ०.७३ |
| ०९ | औषधे व फार्मास्युटिकल्स | ०.२६ | ०.५१ | १.२५ |
| १० | हॉटेल व पर्यटन | १.० | २.९४ | ०.३२ |

स्रोत : https://investmentmonitor.ai[६]

तक्ता १.३ वरुन असे दिसते की, भारतात एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०२० या काळात झालेल्या विदेशी गुंतवणुकीविषयी विश्लेषण केले असता २०१८ ते डिसेंबर २०२० या कालावधीत संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर क्षेत्रात अनुक्रमे ६.४२ दशलक्ष डॉलर, ७.६७ दशलक्ष डॉलर, २४.३९ दशलक्ष डॉलर इतकी गुंतवणूक झाल्याचे दिसते. त्याखालोखाल सेवा क्षेत्रात अनुक्रमे ९.१६ दशलक्ष डॉलर, ७.८५ दशलक्ष डॉलर, ३.८६ दशलक्ष डॉलर इतकी तर बांधकाम पायाभूत उपक्रम क्षेत्रात अनुक्रमे २.२६ दशलक्ष डॉलर, २.० दशलक्ष डॉलर, ७.१५ दशलक्ष डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झाली. तसेच व्यापार क्षेत्रात अनुक्रमे ४.४६ दशलक्ष डॉलर, ४.५७दशलक्ष डॉलर, २.१४ दशलक्ष डॉलर इतकी गुंतवणूक झालेली आहे. तसेच बांधकाम विकास क्षेत्रात सर्वात कमी म्हणजेच अनुक्रमे ०.२१ दशलक्ष डॉलर, ०.६१ दशलक्ष डॉलर, ०.२७ दशलक्ष डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झाल्याचे दिसून येते. यावरुन असे स्पष्ट होते की, कोव्हिड–१९ च्या काळात संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर क्षेत्रात झालेल्या विदेशी गुंतवणुकीचे प्रमाण लक्षणिय असल्याचे दिसते. यामागचे कारण जाणून घेतले असता भारतात सर्वत्र लागू झालेला लॉकडाऊनमुळे सर्व कामे संगणक व सॉफ्टवेअर, हार्डवेअर इत्यादीच्या माध्यमातून होऊ लागल्याने संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर ची मागणी वाढल्याने विदेशी गुंतवणुकीतही वाढ झाल्याचे स्पष्ट होते.

**सारांश**

कोव्हिड–१९ चा परिणाम जगातील सर्वच देशांवर झाल्याने अर्थव्यवस्थेला आर्थिक संकटांचा सामना करावा लागला. जगातील अनेक विकसित देशांचा जीडीपी उणे झालेला असून त्यास विकसनशील व अविकसित देशही सुटलेले नाहीत. जगातील अनेक कंपन्यांनी चीनमध्ये गुंतवणूक व उत्पादन सुरु केले होते परंतु कोव्हिड–१९ चा पहिला रुग्ण चीनमध्ये सापडल्याने व चीनवर कोव्हिड पसरवल्याचा आरोप झाल्याने अनेक विदेशी कंपन्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाल्याने अनेक कंपन्यांनी आपली गुंतवणूक चीन मधून भारतात करण्यास सुरुवात केली. भारत सरकारने विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देत अनेक नियम व अटी शिथिल केल्याने विदेशी गुंतवणुकीचा प्रचंड ओघ भारताकडे सुरु झाला यास दुसरे कारण म्हणजे जगातील प्रचंड मोठी बाजारपेठ भारत हे होय. गेल्या २६ महिन्यात म्हणजेच एप्रिल–मे २०२१ पर्यंत भारतात १,३४,९६६ दशलक्ष डॉलर इतकी गुंतवणूक झालेली दिसून येते. विकसनशील भारतात होणाऱ्या विदेशी गुंतवणुकीमुळे विकासाला चालना मिळण्यास सुरुवात होईल आणि विकसनशील भारत विकसित भारत होण्यास यामुळे मदत होईल परंतु ही वाढ टिकवून ठेवण्याची जबाबदारी व इच्छाशक्ती सरकारने टिकवून ठेवल्यास जागतिक उत्पादन

व सेवा केंद्र म्हणून भारत नक्कीच भविष्यात अग्रेसर असेल यात शंका राहणार नाही.

## संदर्भ सूची

१) आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती २०१०. पृष्ठ १६४–१६५.

२)https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1666134

३)https://mr.vikaspedia.in/social-welfare/other_info/90f92b92194090692f-92e94d9399 2391c947-91593e92f

४)https://theprint.in/economy/india-has-got-record-fdi-this-year-despite-pandemic-but-its-largely-due-to-one-company/589545/

५)https://rbi.org.in/Scripts/BS_ViewBulletin.aspx?Id=20414

६) https://investmentmonitor.ai